# बदर युद्धाच्या अनुषंगाने पवित्र पैगंबर मुहम्मद (स.)चे चरित्र चित्रण आणि ऐतिहासिक प्रसंगांचा उल्लेख

सारांश प्रवचन खुतबा हजरत मिर्जा मसरूर अहमद, मसीहाचे पंचम खलीफा (अल्लाह त्यांचा सहाय्यक असो) दिनांक २ जून २०२३, मशिद मुबारक, टिलफोर्ड यु.के.

أَشْهَدُ أَنْ لَا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحْدَهُ لَا شَرِيكَ لَهُ وَأَشْهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهُ وَرَسُولُهُ أَمَّا بَعْدُ فَأَعُوذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيمِ۔
بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيمِ۔ اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِينَ۔ الرَّحْمٰنِ الرَّحِيمِ۔ مٰلِكِ يَوْمِ الدِّينِ۔ اِيَّاكَ نَعْبُدُ وَاِيَّاكَ
نَسْتَعِينُ۔ اِهْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِيمَ۔ صِرَاطَ الَّذِينَ اَنْعَمْتَ عَلَيْهِمْ ۙ غَيْرِ الْمَغْضُوبِ عَلَيْهِمْ وَلَا الضَّآلِّينَ۔

तशह्हुद, तआवुज आणि सुरह फातिहा च्या पठनानंतर हुजूर अनवर म्हणालेः

बदर युद्धात सामील झालेल्या पवित्र पैगंबर(स.) यांच्या सोबतींचे प्रसंगवर्णन विस्तारितपणे मी माझ्या प्रवचनातून प्रस्तूत केले आहे, पण अनेकांनी ही इच्छा व्यक्त केली आणि मला लिहिले की पवित्र प्रेषित (स.) यांचे चरित्रवर्णन केल्याशिवाय ती अपूर्ण राहील आणि (ती जाणण्याची) तृष्णता बाकी राहील. कारण मुख्य अक्ष प्रेषित मुहम्मद (स.) चे व्यक्तीमत्वच होते, ज्यांच्याभोवती सोबती फिरत होते. त्यांनी एक मानक स्थापित केला जो त्यांच्या पवित्र सामर्थ्याचा आणि अल्लाहवरील विशेष प्रेमाचा पुरावा आहे. त्यामुळे पवित्र पैगंबराचे चरित्रचित्रण महत्त्वाचे आहे.

गेल्या काही वर्षांत पैगंबरांच्या जीवनातील विविध पैलूंवर प्रवचनेही दिली गेली आहेत. परंतु पवित्र प्रेषित (स.) यांचे जीवनचरित्र हा एक असा विषय आहे की तो मर्यादित करता येत नाही. अनेक प्रवचनांमध्येसुद्धा एक गुण समाविष्ट करता येत नाही. त्यांचे चरित्रचित्रण वेळोवेळो नमूद केले जाईल आणि तसे पाहता प्रत्येक प्रवचनात आणि भाषणात, कोणत्या ना कोणत्या पैलूचे वर्णन होत असते, कारण हाच आमच्या जीवनाचा ध्रुव आहे आणि त्याशिवाय आपला धर्म आणि श्रद्धा पूर्ण होऊ शकत नाही आणि अल्लाहने पाठवलेल्या शरियाचे पालन होऊ शकत नाही. तथापि, यावेळी, मी बदरच्या युद्धासंदर्भात पैगंबर (स.) यांच्या जीवनातील आणि इतिहासातील घटना सादर करेन आणि पुढील काही प्रवचनांमध्ये ही मालिका सुरू राहील.

पवित्र पैगंबर (स.) यांच्याच अत्योच्च आदर्शाने प्रेरित होऊन सोबत्यांनी निःस्वार्थ बलिदानाची भावना प्रकट केली आणि या भावनेमुळेच ते लढवय्ये, हौतात्म्ये, परमेश्वर प्रीय आणि त्याची मर्जी संपादन करणारे बनले, ज्याचे काहीं उदाहरण आम्ही आमच्या आयुष्यात पाहिलं. त्यामुळे या युद्धाच्या संदर्भात पवित्र पैगंबर (स.) यांचे अत्योच्च

आदर्श नमूद करणे आवश्यक आहे. युद्धाच्या घटनांपूर्वी, युद्धास कारणीभूत असलेल्या कारणांचे वर्णन करणे देखील आवश्यक आहे. तर प्रथम मी काही पार्श्वभूमी समजावून सांगेन. या पार्श्वभूमीवरही पैगंबरांच्या जीवनातील विविध पैलू आणि त्यांनी आणलेली सुंदर शिकवण उलगडते.

बदर युद्धाच्या कारणांचे वर्णन करताना, हजरत मिर्ज़ा बशीर अहमद साहिब, (र.ज.) ''सिरत खातमुन्नबीय्यीन'' मध्ये लिहितात की मक्केतील काफिरांनी इस्लाम आणि मुस्लिमांविरुद्ध अवलंबलेला दुराचार आणि गैरवर्तन, हे प्रत्येक परिस्थितीत दोन गटांमध्ये युद्धाची ठिणगी उडण्यासाठी पुरेसे होते. अत्यंत घाणेरड्या पद्धतीने आणि सतत अवमान आणि तिरसकारयुक्त मार्गाने मुसलमानांना त्यांच्या उपासकाला पूजन्यापासून रोखले गेले. त्यांना मारहाण केली, त्यांची मालमत्ता लुटली, त्यांच्यापैकी अनेकांची हत्या केली, त्यांच्या स्त्रियांची अब्रू लूटली. जेव्हा काही मुस्लिमांनी एबिसिनियामध्ये स्थलांतर केले तेव्हा त्यांना परत आणण्यासाठी त्यांनी नजाशीच्या दरबारात त्यांचा पाठलाग केला. मुस्लिमांचे प्रमुख म्हणजेच पवित्र पैगंबर (स.) यांना सर्व प्रकारचे त्रास दिले गेले, तैफमध्ये दगडफेक करण्यात आली आणि शेवटी मक्का संसदेतील सर्व प्रमुखांच्या एकमताने असा निर्णय घेण्यात आला की मुहम्मद (स.) ची हत्या करावी. मग या रक्तरंजित ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी मक्केतील तरुणांनी रात्रीच्या वेळी पवित्र प्रेषित (स.) यांच्या घरावर हल्ला केला. मात्र, अल्लाहने त्यांच्यावर कृपा केली आणि ते सुरक्षित राहिले आणि त्यांनी सोर गुहेत आश्रय घेतला. काय हे सर्व षडयंत्र आणि रक्तरंजित ठराव मक्केच्या काफिरांनी केलेली युद्धाची घोषणा नव्हती का? कुरैशांचे हे अत्याचार मुस्लिमांच्या संरक्षणात्मक युद्धासाठी पुरेसे आधार असू शकत नाहीत का? अशा परिस्थितीत काफिरांनी मुस्लिमांना दिलेला अल्टिमेटम जगातील कुठलाही स्वाभिमानी राष्ट्र स्वीकारू शकेल का? अर्थात, मुस्लिमांच्या जागी दुसरे राष्ट्र असते तर ते काफिरांच्या विरोधात खूप आधी युद्धात उतरले असते. परंतु मुस्लिमांना त्यांचे गुरू आणि स्वामीने युद्ध करण्याचा आदेश दिला नव्हता.

जेव्हा मक्केतील काही साथीदारांनी काफिरांच्या अत्याचारांना प्रतिउत्तर देण्यासाठी परवानगी मागितली तेव्हा पैगंबर (स.) यांनी नकार दिला आणि सांगितले की मला क्षमा करण्याचा आदेश देण्यात आला आहे.

अशाप्रकारे, अत्याचार सहन करता करता एक मोठा काळ लोटून गेला आणि मुस्लिमांना मक्केतून बाहेर काढले गेले, तेव्हा परमेश्वराने मुस्लिमांना संरक्षणात्मक युद्ध लढण्याची परवानगी दिली. म्हणून, पवित्र प्रेषित (स.) यांचे स्थलांतर हे कुरैशांच्या अल्टीमेटमच्या स्वीकृतीचे लक्षण होते आणि त्यात परमेश्वराकडून युद्धाच्या घोषणेचा छुपा संकेत होता, जो काफिर आणि मुस्लिम दोघांनाही समजला होता. ही खेदाची गोष्ट आहे की अत्याचारी कुरैशांना हा गुप्त इशारा समजला नाही, अन्यथा जर काफिरांनी यापुढे

धर्माच्या बाबतीत जबरदस्ती करणे थांबवले असते आणि मुस्लिमांना शांततापूर्ण जीवन जगण्याची परवानगी दिली असती तर त्यांना माफ केले गेले असते. परंतु विधीचा विधान पूर्ण होणे होते आणि पवित्र प्रेषित (स.) च्या स्थलांतराने आगीत इंधन भरले. पैगंबराच्या स्थलांतरानंतर काफिरांनी पहिली गोष्ट केली ती म्हणजे त्यांचा पाठलाग करणे आणि गुहेच्या तोंडापर्यंत पोहोचणे. यावेळी अल्लाहने त्यांना विशेष सहाय्यता केली आणि कुरैशांचे डोळ्यांसमक्ष एक पर्दा आणला. पण कुरैश एवढ्यावरच थांबले नाहीत आणि ज्याने प्रेषिताला पकडले त्याला शंभर उंटांचे बक्षीस जाहीर केले. त्यामुळे अनेक तरुण प्रेषितांच्या शोधात निघाले. परंतु या कटकारस्थानामध्ये सुद्धा कुरैशांना अपयशाला सामोरे जावे लागले.

त्याचप्रमाणे, जेव्हा पवित्र प्रेषित मदिनेत स्थलांतरित झाले, तेव्हा मक्केच्या कुरैशांनी मदिनाचे शासक अब्दुल्लाह बिन अबी बिन सलूल आणि त्याच्या साथीदारांना धमकीचे पत्र लिहिले की, तुम्ही आमच्या सोबत्याला आश्रय दिला आहे. आम्ही देवाची शपथ घेतो की एकतर तुम्ही त्याच्याशी लढा किंवा त्याला हद्दपार करा; नाहीतर आम्ही सर्व एकत्र येऊन तुमच्यावर हल्ला करू आणि तुमच्या योद्ध्यांना ठार करू आणि तुमच्या स्त्रियांना अधीन करू. जेव्हा हे पत्र अब्दुल्ला बिन अबी आणि त्याच्या मूर्तिपूजक साथीदारांपर्यंत पोहोचले तेव्हा ते पैगंबरांशी लढण्यासाठी एकत्र आले. पैगंबराना याची खबर मिळाल्यावर त्यांनी त्यांची भेट घेऊन त्यांना समजावून सांगितले आणि त्यांना युद्ध करण्यापासून रोखले.

त्याचप्रमाणे मक्काच्या कुरैशांनी पद्धतशीरपणे इतर अरब जमातींना मुस्लिमांविरुद्ध भडकवले आणि त्यांना युद्धासाठी प्रेरित केले. परिणामी, सर्व अरब मदीनेच्या लोकांचे शत्रू झाले आणि अशी परिस्थिती उद्‌भवली जणू मदीनेभोवती आगच आग आहे.

स्वतः मदीनामध्ये अशी स्थिती होती की औस आणि खज़रज कबिलांमध्ये एक मोठा हिस्सा कट्टर बहुदेवतेला बांधील होता आणि जरी ते त्यांच्या भावा-बहिणींसोबत असले तरी, अशा परिस्थितीत एका बहुदेववादीवर विश्वास कसा ठेवता येईल. त्यानंतर दुसऱ्या क्रमांकावर इस्लामचे शत्रू असलेले दांभिक समूह होता. तिसऱ्या क्रमांकावर ज्यू लोक होते ज्यांच्याशी करार करण्यात आला होता, परंतु या यहुद्यांसाठी कराराची कोणतीच किंमत नव्हती. त्यामुळे त्यावेळी मदिनेतील वातावरण हे मुस्लिमांविरुद्ध गुप्त बारूदसाठ्यापेक्षा कमी नव्हते आणि अरब जमातींकडून आलेली थोडीशी ठिणगी मदिनेतील मुसलमानांना उडवून देण्यास पुरेशी होती. इस्लामवर यापेक्षा गंभीर वेळ कधीच आला नाही. तर, अशा वेळी पवित्र पैगंबरांवर ईश्वराचा साक्षात्कार झाला आणि जिहाद बिस्सैफ (तलवारीच्याआधारे संघर्ष) करण्याचा आदेश प्राप्त झाला. जिहाद बिस्सैफ बद्दल पहिली आयत १२ सफर २ हिजरी रोजी अवतरली. त्यावेळी पवित्र पैगंबर (स.) मदिना येथे येऊन सुमारे एक वर्ष उलटले होते. हुजूर अनवर म्हणाले की, हे हजरत मिर्झा बशीर अहमद साहब यांचे संशोधन आहे. काहींच्या मते ही आयत स्थलांतरानंतर अवतरली

होती. कारण स्थलांतरानंतर लगेचच, पवित्र पैगंबर (स.) यांनी मक्केतील काफिरांच्या काही पक्षांना रोखण्यासाठी सशस्त्र सैन्य पाठवले होते.

सुरह हज्जच्या या दोन आयत आहेत ज्यात पहिल्यांदा जिहादला परवानगी देण्यात आली आहे. अल्लाह फरमावितो की, (लढण्याची) अनुज्ञा त्या लोकांना देण्यात येत आहे, ज्यांच्याविरूद्ध युद्ध केले जात आहे, कारण त्यांच्यावर अत्याचार झाला आहे-आणि निःसंशय अल्लाह त्यांना सहाय्य करण्यास समर्थ आहे- ज्यांना आपल्या घरांतून अन्यायाने हुसकावून लावण्यात आले, केवळ त्यांच्या या म्हणण्यावर (की), आमचा विधाता अल्लाह आहे- आणि अल्लाहने जर मनुष्यांस इतर लोकांनी केलेल्या आक्रमणाविरूद्ध आपले रक्षण करण्याची अनुज्ञा दिली नसती तर खचितच साधूंचे मठ, ख्रिस्त मंदिरे, यहूद्यांची देवळे व मशिदी, जेथे अल्लाहचे सतत नामस्मरण केले जाते, ती सर्व उद्धवस्त केली गेली असती. हुजूर म्हणाले, की येथे सर्व धमस्थळांचा उल्लेख करून त्यांची सुरक्षा करण्याचा उल्लेख केला गेला आहे.(सुरह अल् हज्ज-)

जिहाद अनिवार्य झाल्यानंतर, पवित्र प्रेषित (स.) यांनी सुरुवातीला मुसलमानांना काफिरांच्या दुष्टप्रवृत्तीपासून वाचवण्यासाठी चार उपायांचा अवलंब केला. प्रथम, त्यांनी स्वबळावर प्रवास केला आणि मदिनाच्या सभोवतालच्या राष्ट्रांशी करार केले. दुसरे म्हणजे, त्यांनी मदीनाच्या आसपासच्या भागात छोटे छोटे संदेशवाहक पथक पाठवायला सुरुवात केली. तिसरे म्हणजे या पथकांमुळे दुर्बल मुस्लिमांना मदिनेत येऊन मुस्लिमांना भेटण्याची संधी मिळाली. चौथे म्हणजे, पवित्र प्रेषित (स.) यांनी काफिरांच्या व्यापारी काफिल्यांना थांबवण्यास सुरुवात केली जे मक्केहून सीरियाच्या दिशेने जाताना मदीनाजवळून जात असत.

हुजूर अनवर यांनी ही मालिका पुढेही चालू राहण्याची घोषणा केली आणि मग चार दिवंगत झालेल्या अहमदींचे संक्षिप्त प्रसंगवर्णन आणि नमाज ए जनाजा अदा करण्याची घोषणा केली.

१. यूकेचे मा. ख्वाजा मुनिरुद्दीन कमर साहिब (उपस्थित मृत) यांचा उल्लेख झाला. २. माननीय डॉ. मिर्झा मुबशिर अहमद साहिब, ते हजरत मुस्लेह माऊद (अ.स.)चे नातू आणि आदरणीय डॉ. मिर्झा मुन्नवर अहमद साहिब यांचे पुत्र होते. ते दिवंगत नवाब मुबारका बेगम साहिबा यांचे नातू होते. नुकतेच वयाच्या ७९ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. ते वक्फे जिन्दगी होते(धर्मासाठी जीवनत्याग) आणि सुमारे पन्नास वर्षे फझल-उमर हॉस्पिटल रबवाहमध्ये त्यांना सेवा करण्याची संधी मिळाली. १९८३ पासून ते निधनापर्यंत ते वक्फ ए जदीद विभाग मंडळाचे सदस्य होते. ते विनम्र स्वभावाचे, खिलाफतशी अतूट संबंध जपणारे, सद्‌भावनेने व्याप्त, सर्वांशी समान वागणूक ठेवणारे आणि उपचार करताना अतोनात प्रयत्न करणारे आणि श्रद्धावंत व्यक्तिमत्व होते.

३. मा. सय्यदा अमतुल बासित साहिबा, इस्लामाबाद, पाकिस्तानच्या सय्यद महमूद अहमद साहिब यांच्या पत्नी.

४. मा. शरीफ अहमद बंदिशा साहिब, अधवाली जिल्हा, फैसलाबाद.

हुजूर अनवर यांनी सर्व मृताकांसाठी क्षमा आणि अध्यात्मिक उन्नतीसाठी प्रार्थना केली.

اَلْحَمْدُ لِلّٰہِ! اَلْحَمْدُ لِلّٰہِ نَحْمَدُہٗ وَنَسْتَعِیْنُہٗ وَنَسْتَغْفِرُہٗ وَنُؤْمِنُ بِہٖ وَنَتَوَکَّلُ عَلَیْہِ وَنَعُوْذُ بِاللّٰہِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَیِّئَاتِ
اَعْمَالِنَا مَنْ یَّھْدِہِ اللّٰہُ فَلَا مُضِلَّ لَہٗ وَمَنْ یُّضْلِلْہُ فَلَا ھَادِیَ لَہٗ وَنَشْھَدُ أَنْ لَّآ اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ وَنَشْھَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُہٗ وَرَسُوْلُہٗ،
عِبَادَ اللّٰہِ رَحِمَکُمُ اللّٰہِ اِنَّ اللّٰہَ یَاْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِیْتَآءِ ذِی الْقُرْبٰی وَیَنْھٰی عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْکَرِ وَالْبَغْیِ یَعِظُکُمْ
لَعَلَّکُمْ تَذَکَّرُوْنَ اُذْکُرُوا اللّٰہَ یَذْکُرْکُمْ وَادْعُوْہُ یَسْتَجِبْ لَکُمْ وَلَذِکْرُ اللّٰہِ اَکْبَرُ۔